

## माझ्या शब्दांत मी-पु.भा.भावे

१२ एप्रिल १९१० रोजी धुळे येथे माझा जन्म झाला.माझे वडील ती.भास्कर हरी भावे हे डॉक्टर होते.त्यांचे वडील रावबहाद्दूर हरी श्रीधर भावे हे मॅजिस्ट्रेट व शिक्षण विभागात अधिकारी होते.१८५७ पूर्वीच मिरजेहून ते नागपूरला गेले.मलकापूर ते नागपूर हा प्रवास त्यांनी बैलगाडीने केला. आमचे कुटुंब सुखवस्तू होते. माझी पहिली आठवण पावसाळ्यातल्या वहात्या पाण्यात कागदी सोडण्यासंबंधी आहे.त्यावेळी माझे वय सरासरी १।। ते २ वर्षांचे होते असे मला माझ्या आजीने ( आईची आई )सांगितले.या आजीनेच मला व माझ्या धाकट्या भावाला ( चि.डॉ.वासुदेव भा.भावे) वाढविले.आणि माणसात आणले.कारण माझी आई १९१८ सालच्या एन्फ्लुएंझात पंचविशीच्या तरूण वयातच नागपूर येथे आमच्या वाड्यात गेली. तेव्हा माझे वडील पहिल्या महायुध्दाच्या निमित्ताने परदेशी होते. माझी आई नागपूर येथे आमच्या राहत्या वाड्यात वडिलांची आठवण काढीत गेली. तिच्या शेवटच्या इच्छेप्रमाणे तिच्या २।। व ७ वर्षांच्या मुलांना तिच्या आईने (माझ्या आजीने) वऱ्हाडात मलकापूर येथे सांभाळण्यासाठी नेले. ईंग्रजी तिसरीपर्यंत तेथेच माझे शिक्षण झाले. माझी आजी अतिशय प्रेमळ पण तितकीच करडी आणि कतृत्ववान बाई होती.माझे आजोबा ती. सदाशिव बा. जोशी हे स्वभावाने अतिशय शांत व सोशिक असे होते. माझी आई हे त्यांचे एकुलते एक अपत्य होते.तिच्या मृत्युचे दु:ख आम्हा दोघा भावांकडे पाहुन त्यांनी सहन केले. माणसाची दु:ख सहन करण्याची शक्ती अमर्याद असते.या सत्याचा मी स्वत: भरपूर अनुभव घेतला.

(सौजन्य : डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार-ऑगस्ट २००९)